नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 11/06/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## खूनातील आरोपी 24 तासात जेरबंद
## पोलिस स्टेशन खापरखेडा व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरित्या केलेली कारवाई

अंतर्गत 10 कि. मी अंतरावर पो.स्टे. खापरखेडा पासुन ते दहेगाव सावनेर रोड वर पिपळा डाग बंगला येथे दिनांक 09/06/2021 ते दिनांक 10/06/2021 चे रात्री दरम्यान संतोष गोकुलनाथ सोलंकी(मृतक), वय 55 वर्ष, रा. पिपळा डाग बंगला हा आपले राहते घरी पलंगावर झोपुन असता अज्ञात आरोपीने घराचे आत प्रवेश करुन लोखंडी टिकासने मृतकाच्या डोक्यावर गंभीर वार करुन खुन केला. अशी माहिती मिळताच पोलिस स्टेशन खापरखेडाच्या पथकाने तपास केला असता आरोपी नामे क्र. 1) जयपाल चव्हाण वय 21 वर्ष, 2) पवन चव्हाण दोघही रा. धापेवाडा ता. कळमेश्वर व 3) धीरज उर्फ दिनेश धुर्वे(रा. हरदोली) व 4) मनीष सिताराम बनारसे, वय 21 वर्ष रा. हरदोली, त. सावनेर अशी आरोपीतांची नावे निषपन्न झाली. यापैकी आरोपी नामे– जयपाल चव्हाण व पवन चव्हाण हे मृतकाचे भाचे असून मनीष व धीरज पवनचे मित्र आहेत. मामेबहिणी सोबत लग्न लावून देण्यास मामाचा(मृतकाचा) विरोध असल्याने चिडलेल्या भाच्यांनी त्यांच्या धीरज धुर्वे व मनीष बनारसे या दोन मित्रांच्या मदतीने मामाचा झोपेत छाती व डोक्यावर टिकासने वार करून जिवानीशी ठार केले. सदर घटना हि दिनांक 09/06/2021 चे मध्यरात्री घडली दिनांक 10/06/2021 चे सकाळी उघडकीस आली. आरोपी क्र. 4) मनीष सिताराम बनारसे, वय 21 वर्ष रा. हरदोली, त. सावनेर याला दि. 11/06/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून पुढील कार्यवाही करीता पो.स्टे. खापरखेडा यांच्या ताब्यात देण्यात आले.

मृतक हा बांधकाम कामगार म्हणुन काम करायचा. धापेवाडा येथे त्याची बहीण राहत असल्याने कोटुंबिक वादामुळे त्याची पत्नी दोन मुली व मुलाला घेउन काही दिवसांपुर्वी धापेवाडा येथे रहायला गेली. त्यामुळे मृतक घरी एकटाच होता. तसेच मृतक याचे घरी कावीळने आजारी असलेले पेशंट त्याच्या घरी गावठी उपचार करण्याकरीता येत होते. दि. 10/06/2021 रोजी उपचारा करणाऱ्यांपैकी एक इसम मृतकाच्या घरी गेला असता संतोष सोलंकी याचा खून करण्यात आल्याचे उघडकीस आले. सदर माहिती मिळताच पो.स्टे. खापरखेडा चे ठाणेदार श्री. चंद्रकांत काळे यांनी घटनास्थळ गाठले. तसेच पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी कन्हान श्री. मुख्तार बागवान व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. सदर गुन्हायात आरोपीतांविरुध्द कलम 452, 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंधारे पो.स्टे. खापरखेडा मो.क्र. 9823150134 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी कन्हान श्री. मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, ठाणेदार पोनि श्री. चंद्रकान्त काळे, पोउपनि श्री अभिषेक अंधारे तर कर्मचारी उमेश ठाकरे, आशिष भुरे, प्रमोद भोयर, नुमान शेख, अलीम शेख, राजु भोयर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरित्या केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर